लोकमत

epaper.lokmat.com
कोल्हापूर, शनिवार, दि. १७ फेब्रुवारी २०२४

# नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व अकॅडेमिक बँक क्रेडिटचा अवलंब'वर कार्यशाळा झाली. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांचे बीजभाषण झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

डॉ. एम. एस. देशमुख म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षक आणि प्रशासनावर आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी माहितीपत्रके तयार करावीत, स्कूल कनेक्टसारखे अभियान राबवावे व विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती द्यावी.

महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी. लोखंडे, विवेकानंद महाविद्यालयाच्याअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. सिद्धार्थ कट्टीमणी, डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्सच्याअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. शिवलिंग राजमाने यांनी मार्गदर्शन केले. डॉ. ए.बी. बलुगडे यांनी स्वागत केले. डॉ. आर.डी. मांडणीकर यांनी आढावा घेतला. एस.एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के.एम. देसाई यांनी आभार मानले.

17/02/24

17.2.24

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

द ■ मराठी दैनिक

ग्लोबल टाइम्स

■ मुंबई ■ अंक : ३६ ■ वर्ष : १२

■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621

Web Site : www.theglobaltime.com ■ शनिवार दि. १७ फेब्रुवारी २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

### पंतप्रधानांशी शैक्षणिक प्रश्नावर बोलण्याची मिळाली संधी

# 'परीक्षा पे चर्चा' मध्ये विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी रोहन रावळ सहभागी



कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये बी.सी.ए. वर्गात शिकणारा विद्यार्थी रोहन शांतीनाथ रावळ यास परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोबत शैक्षणिक प्रश्नावर बोलण्याची संधी मिळाली.

त्यामध्ये रोहन रावळने उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पण आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या प्रवेश फी संबंधीत खूप महत्वाचा प्रश्न मांडला आहे. याची दखल घेऊन केंद्र शासनातर्फे त्याला १४ एप्रिल २०२४ रोजी दिल्ली येथे बोलाविण्यात आले आहे.

आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या प्रवेश फी संबंधीत प्रश्नावर महाराष्ट्र शासनाने दखल घेतली व त्यामुळे त्याची दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी मंत्रालय मुंबई येथे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी भेट झाली. यामध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उच्च शिक्षणामध्ये मुलींना फी माफ करण्याचे आश्वासन दिले आहे व त्याबाबतचा लेखी शासन निर्णय (जी.आर) सदर विद्यार्थी रोहन रावळ यास मिळणार असल्याची माहिती दिली आहे.

17/02/24